जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2017
तरुण भारत

# कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीसमोरील कर्मवीर पाटील यांच्या पुतळयाला आणि विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या पोर्चमधील त्यांच्या प्रतिमेला प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी खासदार संजयकाका पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, प्रा. पवन शर्मा, संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. ए. रायकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव जी.एस. राठोड, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, आर. एस.पाटील यांच्यासह अधिकारी, प्रशासकीय सेवक आदी उपस्थित होते.

27 SEP 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन

**कोल्हापूर :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. राज्यशास्त्र अधिविभागात पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. एन. सी. माळी, मोनिका खाचणे, गजानन साळुंखे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2017

लोकमत

# पंडित दीनदयाळ यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये सोमवारी त्यांना अभिवादन केले. विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामध्ये पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते.

27 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभिनय, नृत्याविष्काराने महोत्सवाला साज








गारगोटी : शास्त्रीय नृत्य सादर करताना विद्यार्थिनी. दुसऱ्या छायाचित्रात एकांकिका सादर करताना विद्यार्थी.

गारगोटी, ता. २६ : येथील मौनी विद्यापीठात कर्मवीर हिरे महाविद्यालयातर्फे सुरू असलेला शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव रंगतदार बनला आहे. ताल, सुरांच्या साथीला वाद्यांचा बाज आणि तरुणाईच्या अभिनय व नृत्याविष्काराने चांगलाच साज चढविला आहे. तरुणाईच्या एकच जल्लोषाने महोत्सवाची शान वाढविली. विविध स्पर्धेत एकापेक्षा एक युवक-युवतींचा संघ आपली कला सादर करत आहेत.

स्पर्धेतील वाद्ये, वाद्य प्रकार, विविध नृत्यकलांनी मौनी विद्यापीठात सांस्कृतिक वातावरण बनले आहे. भुदरगडच्या रसिक श्रोत्यांनी सांस्कृतिक मेजवानीचा मनमुराद आनंद लुटला. महोत्सवात आज दुसऱ्या दिवशी पाश्चिमात्य एकलगीत, पाश्चिमात्य समूहगीत कार्यक्रमांनी जोशपूर्ण वातावरण निर्माण केले. सोमवारच्या लोककला स्पर्धेला सर्वाधिक दाद मिळविली. वाघ्या मुरळी, गोंधळी, गौरीगीते, लावणी, खंडोबाचा गोंधळ या पारंपरिक लोककला सादरीकरणाने कार्यक्रमाची शोभा वाढविली. कलाकारांची वेशभूषा, विविध साधने यामधून महाराष्ट्राच्या लोककलेचे दर्शन घडविले. या स्पर्धेस टाळ्या व शिट्टी वाजवून प्रेक्षकांनी जोरदार प्रतिसाद दिला. पाश्चिमात्य एकलगीतात वापरलेले अद्ययावत वाद्य साहित्य युवकांत लक्षवेधी ठरले. शास्त्रीय सुरांच्या मैफलीने महोत्सवाचा साज चढविला; तर शास्त्रीय नृत्याचा ठेका मनाला भुरळ घालणारा ठरला. समाजातील विविध घडामोडींचे दर्शन घडविणाऱ्या एकांकिका स्पर्धा सर्वांच्या पसंतीस उतरल्या. ज्योतिर्लिंग मंदिराच्या आवारात पथनाट्य स्पर्धा झाल्या. यात समाजमनातील अस्वस्थता व प्रबोधनात्मक मार्गावर स्पर्धकांनी प्रकाशझोत टाकला. मूकनाट्य, पोस्टर मेकिंग, व्यंगचित्रण, मातीकाम, स्पॉट फोटोग्राफी स्पर्धेलाही स्पर्धकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

**महोत्सवाचा आज समारोप**

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा उद्या (बुधवारी) समारोप होणार आहे. महोत्सवाचा उद्या तिसरा दिवस आहे. सकाळी नऊ ते दुपारी एक या वेळेत नकला, एकपात्री, प्रश्नमंजूषा, स्पॉट पेंटिंग स्पर्धा होतील. दुपारी एक वाजता समारोप समारंभ होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे प्रमुख पाहुणे आहेत. मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष आमदार सतेज पाटील अध्यक्षस्थान भूषवतील. आमदार प्रकाश आबिटकर व मौनी विद्यापीठाचे पदाधिकारी प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती संचालक डॉ. आर. डी. बेलेकर व प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2017

तरुण भारत

# युवा महोत्सवाने जिंकली गारगोटीकरांची मने



गारगोटी : युवा महोत्सवातील विविध कला सादर करताना विद्यार्थिनी.

प्रतिनिधी
गारगोटी

येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयातर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात तरूणाईच्या जल्लोषाला उधाण आले आहे. तरूणाई नृत्याविष्कार, त्याला ताल, सूरांची साथ, विविध वाद्यांचा बाज याने महोत्सवाची शान वाढविली आहे. महोत्सवामुळे मौनी विद्यापीठाच्या आवारात तरूणाईच्या उत्साहाला उधाण आले आहे.

महोत्सवात लोककला स्पर्धेला श्रोत्यांनी सर्वाधिक पसंती दर्शविली. युवक– युवतींच्या एकापेक्षा एक सरस नृत्य अविष्कारावर श्रोते फिदा झाले. वेगवेगळ्या स्पर्धेतील वाद्ये, वाद्य प्रकार, नृत्य प्रकाराने मौनी विद्यापीठात सांस्कृतिक वातावरण बनले आहे. सोमवारी लोकवाद्य वृंद, लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेस चांगला प्रतिसाद लाभला.

महोत्सवात आज दुसऱ्या दिवशी पाश्चिमात्य गीतांनी कार्यक्रमात जोशपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. लोककला स्पर्धेला सर्वाधिक दाद मिळाली. वाघ्या मुरळी, गोंधळी, गौरीगीते, लावणी, खंडोबाचा गोंधळ या पारंपारिक लोककला सादर करण्यात आल्या. लोककलेसाठी कलाकारांनी केलेली वेशभूषा, वापरलेली विविध साधने यामधून अखंड महाराष्ट्राच्या लोककलेचे दर्शन घडविले. त्याला टाळ्या व शिट्टी वाजवून रसिकांनी प्रतिसाद देत जल्लोष साजरा झाला.पाश्चिमात्य एकलगीतामध्ये वापलेली अद्यावत वाद्य साहित्य युवकांत लक्षवेधी ठरली. शास्त्रीय सूरांच्या मैफिलीने महोत्सवाचा साज चढविला. तर शास्त्रीय नृत्याचा ठेका मनाला भुरळ घालणारा ठरला.

27 SEP 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मौनी विद्यापीठात युवा महोत्सवात तरुणाईच्या जल्लोषाला उधाण

**गारगोटी / प्रतिनिधी :**

येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयातर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात तरुणाईच्या जल्लोषाला उधाण आले आहे. नृत्याविष्कार, त्याला तालासुरांची साथ, विविध वाद्यांचा बाज यामुळे महोत्सवात रंगत आली आहे. या महोत्सवामुळे मौनी विद्यापीठाचा परिसर तरुणाईने फुलून गेला आहे.

महोत्सवात लोककला स्पर्धेवेळी श्रोत्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती. यावेळी युवक-युवतींनी एकापेक्षा एक सरस नृत्याविष्कार सादर केले. सोमवारी लोकवाद्य वृंद, लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेस प्रतिसाद लाभला. मंगळवारी पाश्चिमात्य एकलगीत, पाश्चिमात्य समूहगीत कार्यक्रमांनी जोशपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यावेळी वाघ्या-मुरळी, गोंधळी, गौरीगीते, लावणी, खंडोबाचा गोंधळ या पारंपरिक लोककला सादर करण्यात आल्या. यावेळी कलाकारांची वेशभूषा, वापरलेली साधने यामधून महाराष्ट्राच्या लोककलेचे दर्शन घडले. पाश्चिमात्य एकलगीतामध्ये वापलेली अद्ययावत वाद्ये लक्षवेधी ठरली. शास्त्रीय संगीत सुरांच्या मैफलीने महोत्सवाला साज चढला, तर शास्त्रीय नृत्याच्या ठेक्याने मनाला भुरळ घातली. समाजातील विविध घडामोडींचे दर्शन घडवणाऱ्या एकांकिका स्पर्धा सर्वांच्या पसंतीस उतरल्या. समाजमनातील अस्वस्थता व प्रबोधनात्मक वाटचालीवर पथनाट्याने स्पर्धेत प्रकाशझोत टाकण्यात आला.



गारगोटी : येथे मध्यवर्ती महोत्सवात एकांकिका सादर करताना विद्यार्थी.